महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९३६ /२०२४ दि. १४/०८/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये दिनांक १५/०८/२०२४ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त कुळगांव बदलापूर नगरपरिषद, प्रशासकिय इमारतीचे उद्घाटन तसेच बदलापूर शहरामध्ये शिवसेना पक्षातर्फे वर्षा मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाकरिता मा. श्री. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी सचिन गोरे, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) एम स्वीट्स बदलापूर पुर्व रेल्वे स्टेशनकडून गांधी चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **एम स्वीट्स बदलापूर पुर्व रेल्वे स्टेशन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने बदलापूर पुर्व रेल्वे गेट कडून मच्छी मार्केट रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) गांधी चौक कडून बदलापूर पुर्व रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गांधी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने होप इंडिया कडून डि.जी. वन शोरूम रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) वैशाली टॉकिजच्या बाजूला आय हॉस्पीटल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **राठोड हॉस्पीटल** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने वैशाली टॉकिज पश्चीम रेल्वे स्टेशन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसुचना दि. १५/०८/२०२४ रोजी सकाळी १०:०० वा. ते २०:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( सचिन गोरे )
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

CamScanner

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत</u>** :— <u>पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :— <u>सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.</u>

CamScanner